|| सा विद्या या विमुक्तये ||

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

जनसंपर्क कार्यालय (PUBLIC RELATIONS OFFICE)

Phone: (02462) 229325 Website: www.srtmun.ac.in E-mail: srtmunpro1@gmail.com

संदर्भ क्र.: ज.का./२०२१-२२/६३ दि.२९/०६/२०२१

## 'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग' मध्ये विद्यापीठाच्या कुलगुरूसह १७ प्राध्यापकांचा समावेश

'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग-२०२१' अमेरिकेतील आल्पर-डॉझर सायंटिफिक इंडेक्सने जाहीर केल आहे. यामध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्यासह इतर १७ संशोधक प्राध्यापकांचा समावेश आहे. या रँकिंगमुळे जागतिक स्तरावर विद्यापीठाला आणि संशोधक प्राध्यापकांना मानाचे स्थान असते.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील प्रा. राजाराम माने, प्रा. वसंत वाघ, प्रा. राहुल पिंजारी, प्रा. काशिनाथ बोगले, प्रा. शैलेश वाढेर, प्रा. अनुपमा पाठक, प्रा. कृष्णा चैतन्य, प्रा अनिकेत मुळे, प्रा. ज्ञानेश्वर पवार, प्रा. अर्जुन भोसले, प्रा. संजय पेकमवार, प्रा. शैलेश पटवेकर, प्रा. के. विजयकुमार यांचा समावेश आहे. तर उपकेंद्रातील विकास हंबे, इब्राहिम राहावे आणि फुरसत याबीन या संशोधकांचाही समावेश आहे.

'आल्पर-डॉझर सायंटिफिक इंडेक्स' चे जनक अमेरिकेच्या निशिगन विद्यापीठातील प्रा. मुरत आल्पर व प्रा.सिहान डॉझर हे आहेत. संशोधकांनी मागील पाच वर्षातील एच इंडेक्स ,आयटेन इंडेक्स आणि सायटेशन स्कोअर या बाबी विचारात घेऊन युनिव्हर्सिटी रँकिंग, कंट्री रँकिंग, रिजन रँकिंग आणि वर्ल्ड रँकिंग ठरविण्यात आलेले आहे. १८१ देशातील १० हजार ६५५ विद्यापीठातील ५ लाख ६५ हजार ५५३ संशोधकांची माहिती संकलित करून ही श्रेणी ठरविण्यात आलेली आहे. यामध्ये अर्थशास्त्र, विधी, तत्त्वज्ञान, कृषी, कला, वाणिज्य व व्यवस्थापन, सामाजिकशास्त्र, वैद्यकीय व आरोग्य विज्ञान, इतिहास, यांच्यासह २५६ उपशाखामधील संशोधकांनी या नामांकनात स्थान मिळविलेले आहे. या रँकिंगमध्ये स्थान मिळाल्यामुळे युजीसी आणि सॅप मध्ये वरिष्ठ वैज्ञानिक म्हणून या प्राध्यापकांची नोंद होत असते. व तसेच नॅक साठी सामोरे जाताना विद्यापीठाला चांगला दर्जा मिळविण्यासाठी यांची निश्चितच मदत होते.

विद्यापीठाच्या कुलगुरूसह सर्व संशोधक, प्राध्यापक यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

---

प्रति,<br>
मा. संपादक/ जिल्हा प्रतिनिधी,<br>
दैनिक/इलेक्ट्रॉनिक मेडिया/सामाजिक संपर्क माध्यम,<br>
सप्रेम नमस्कार,<br>
मान्यवर/ महोदय,<br>
उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्धीस देऊन सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

जनसंपर्क अधिकारी,<br>
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,<br>
ज्ञानतीर्थ, विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६.